177

महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग

# अनुसूचित क्षेत्रातील आदिवासींवर उद्योगधंद्याचा झालेला परिणाम- मूल्यमापन अहवाल
## वर्ष २००४-०५

आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

# अ नु क्र म णि का


| अ.क्र. | तपशील | | पृष्ठे | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| १ | प्रस्तावना | | १ | - |
| २. | प्रकरण क्रमांक १ | मूल्यमापन उद्देश | २ | - |
| ३ | प्रकरण क्रमांक २ | सर्वेक्षणाची कार्यपध्दती | ३ | ५ |
| ४. | प्रकरण क्रमांक ३ | सध्याचे औद्योगिक धोरण | ६ | १५ |
| ५. | प्रकरण क्रमांक ४ | मूल्यमापन सर्वेक्षणाचे पृथ:करण | १६ | ३३ |
| ६. | प्रकरण क्रमांक ५ | सारांश | ३४ | ३५ |
| ७. | प्रकरण क्रमांक ६ | अडचणी व शिफारशी | ३६ | ३७ |
| ८. | प्रकरण क्रमांक ७ | निष्कर्ष | ३८ | - |
| | | लाभार्थी प्रपत्र एक ते तीन | ३९ | ४६ |


***

# प्रस्तावना

राज्याच्या जलद आर्थिक विकासामध्ये उद्योगधंदे महत्वाची भूमिका बजावत असतात. औद्योगिक विकासाध्ये महाराष्ट्र हे देशामध्ये आघाडीचे राज्य आहे. भारतातील एकूण औद्योगिक उत्पादनापैकी २० % औद्योगिक उत्पादन हे महाराष्ट्र राज्यामधील असल्याचे दिसून येते.महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक विकास हा सर्व जिल्हयांमध्ये सारख्या प्रमाणात झाल्याचे दिसून येत नाही. बहुतेक उद्योगधंदे हे मुंबई, ठाणे, पुणे व नाशिक या विभागात एकवटल्याचे दिसून येते. उद्योगधंद्याचा मागासलेल्या भागात विस्तार व्हावा असे महाराष्ट्र शासनाचे सध्याचे औद्योगिक धोरण आहे.

सन २००४ मध्ये आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने या विषयाचे मूल्यमापन करण्याचे काम हाती घेतले. या सर्वेक्षणाचे काम श्री.एस.बी.दराडे, संशोधन अधिकारी यांचेकडे देण्यात आले होते. त्याप्रमाणे श्री.एस.बी.दराडे, संशोधन अधिकारी व श्री.एस.आर.तरकसबंद, संशोधन सहाय्यक यांनी क्षेत्रीय पहाणीचे काम केले व श्री.एम.आर.गोसावी, संशोधन अधिकारी यांनी अहवाल लिहिण्याचे काम केले.

सदर मूल्यमापन पाहणीचे फेर सर्वेक्षण श्री.के.एस.चव्हाण, सांख्यिकी अधिकारी, श्री.पी.बी.कुदळे, संशोधन सहाय्यक ,श्री.एस.आर.तरकसबंद संशोधन सहाय्यक व श्री.आर.एस.पवार, अन्वेषक यांनी केले असून अहवाल लिहिण्याचे काम श्री. के.एस.चव्हाण सांख्यिकी अधिकारी यांनी श्री. एस. डी. बिराजदार,उप संचालक (ए.क्षे.वि.का.) यांच्या मार्गदर्शनाखाली केले असून अहवालाच्या संगणकीय टंकलेखनाचे(डि.टी.पी.) काम श्रीमती.एस.बी.रोकडे यांनी केले आहे.

सदर मूल्यमापन पहाणी अहवाल उद्योग ऊर्जा व कामगार विभागातील योजनाची आखणी व अंमलबजावणी करणारे अधिकारी व कर्मचारी यांना उपयोगी पडेल अशी अपेक्षा आहे.

(डॉ.शरद किनकर )
आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे

दिनांक :- २८/६/०६

ठिकाण :- पुणे

# प्रकरण - १

## मूल्यमापनाचे उद्देश

अनुसूचित क्षेत्रामध्ये शासनाकडून लघुउद्योग व मध्यम स्वरुपाचे उद्योग सुरु करण्यासाठी प्राधान्य देऊन ग्रामीण भागामध्ये उद्योग सुरु करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. या उद्योगामुळे, अनुसूचित क्षेत्रातील स्थितीमध्ये कशा स्वरुपाचे परिणाम दिसून येत आहेत हे पाहण्यासाठी हे सर्वेक्षण हाती घेण्यात आले असून या सर्वेक्षणाचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत.

१) अनुसूचित क्षेत्रातील उद्योगधंद्यांना शासनाच्या कोणकोणत्या सवलतींचा लाभ झाला आहे. याचा अभ्यास करणे.

२) उद्योग धंदयापासून आदिवासींना कोणत्या स्वरुपाचा लाभ होऊन त्यांची आर्थिक स्थिती कितपत सुधारली याचा अभ्यास करणे.

३) आदिवासी भागातील ग्रामपंचायतींच्या आर्थिक स्थितीमध्ये काय परिणाम झाला आहे हे पहाणे.

४) उद्योग धंद्यामुळे वायु प्रदुषण व पाणी प्रदुषण झाले आहे का? याचा अभ्यास करणे.

* * *

# प्रकरण - २

## सर्व्हेक्षणाची कार्यपध्दती

अनुसूचित क्षेत्रातील आदिवासीवर उद्योग धंद्याचा झालेला परिणाम या योजनेचे मूल्यमापन करण्यासाठी एकूण तीन प्रपत्रे तयार करण्यात आली होती. ती खालीलप्रमाणे आहेत.

१) उद्योगधंद्याच्या माहितीचे प्रपत्र

२) ग्रामपंचायत सदस्य / सामाजिक कार्यकर्ता यांचे प्रपत्र

३) लाभार्थी (कारखान्यातील कामगार) प्रपत्र

(१) **उद्योग धंद्याचे प्रपत्रामध्ये उद्योगाबाबतची प्राथमिक माहिती :-**

१) औद्योगिक संस्थेचे नांव व पत्ता

२) व्यवसाय उद्योग नोंदणीकृत आहे का?

३) उद्योग नोंदणीकृत असल्यास कोणत्या कायद्यान्वये नोंदणी केलेली आहे, व त्याचा नोंदणी क्रमांक काय आहे.

४) उद्योग व्यवसाय कोणत्या प्रकारचा आहे.
उदा. :- उत्पादकीय सेवा पुरविणारा व्यवसाय, व्यापारी व्यवसाय

(२) **उद्योग धंद्यास लागणारा कच्चा माल :-**

१) कोणत्या स्वरुपाचे उत्पादन आहे. त्यानुसार लागणारा कच्चा माल, एकच प्रकारचा माल उत्पादीत होतो का?

२) वेगवेगळ्या प्रकारचा माल उत्पादित होतो, त्याप्रमाणे लागणारा कच्चा माल

३) उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल कोठे मिळतो व तो पुरेशा प्रमाणात मिळतो का? कच्च्या मालाबाबत काही समस्या आहेत काय?

(३) **उद्योग धंद्यास लागणारा कामगार वर्ग:-**

१) उद्योग धंद्यास लागणारे कामगार स्थानिकरित्या पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत काय?

२) सदरील उद्योग किती पाळ्यामध्ये चालतो त्यानुसार लागणारा कामगार वर्ग.

(४) **उत्पादनासाठी लागणा-या पुरक सूविधांबाबत :-**

१) उद्योगासाठी पाणी पुरेसे आहे काय?

२) विज पुरवठा पुरेशा प्रमाणात आहे काय?

(५) **उत्पादित मालाच्या विक्रीबाबत :-**

१) उत्पादित माल कोणत्या बाजारपेठेत विकला जातो. देशात / विदेशात

२) आदिवासी भागात उद्योग असल्याने महाराष्ट्र शासनाच्या व केंद्र शासनाच्या कोणकोणत्या सवलती मिळतात.

३) सदर उद्योगाने I.S.I./I.S.O/. - ९००० प्रमाणपत्र मिळवले आहे काय?

(६) **उद्योग धंद्याची विक्री व नफ्याबाबत :-**

यामध्ये आर्थिक वर्षनिहाय एकूण विक्री, करपूर्व नफा व करपच्छात नफा याबाबत माहिती घेण्यात आली आहे.

(७) **कारखान्यापासुन होणा-या प्रदुषणाबाबत :-**

१) यामध्ये उद्योगासाठी वापरलेले पाणी, रसायन मिश्रीत पाणी असे दूषित पाणी आदिवासी वस्त्यांजवळ जाते काय? दूषित पाण्यामुळे अदिवासी वस्त्यांमध्ये रोगराई होते काय?

२) हवा प्रदुषण / ध्वनी प्रदुषण यामुळे आदिवासींच्या वास्तव्यावर प्रत्यक्ष परिणाम झाला आहे काय?

(८) **समाजाभिमूख कार्य :-**

१) उद्योगामार्फत सामाजिक बांधिलकी म्हणून आदिवासींच्या कल्याणासाठी काही प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष मदत केली जाते का?

२) उद्योगामध्ये आदिवासी मुलांना नोकरीची संधी मिळते काय? याबाबतची माहिती घेण्यात आलेली आहे.

(२) **ग्रामपंचायत सदस्य / सामाजिक कार्यकर्ता यांचे प्रपत्र :-**

या प्रपत्रामध्ये सामाजिक कार्यकर्त्याचे नांव, गांव, पत्ता व धारण केलेले पद याबाबतची माहिती घेण्यात आली असून सदर प्रकल्प उद्योगामध्ये आदिवासी पाडा व वस्ती यांना उद्योग धंद्यापासून प्रतिकुल परिणाम झाला आहे काय?

उदा. :- हवा / पाणी प्रदुषण झाले आहे काय, सदर प्रकल्प उद्योगापासून बेकारांना नोकरीचा लाभ झाला आहे काय? सदर प्रकल्प उद्योग गावातील लोकासाठी राबवित असणाऱ्या लोकोपयोगी योजना इत्यादी बाबत माहिती घेण्यात आली आहे.

## (३) लाभार्थी (कारखान्यातील कामगार) प्रपत्र :-

या प्रपत्रामध्ये लाभर्थीचे नांव, गांव व पूर्ण पत्ता, लाभार्थीची जात/जमात हयाच बरोबर लाभार्थ्यास प्रकल्प उद्योगापासून कोणत्या प्रकारचा लाभ मिळाला.

उदा. नोकरी सामुदायिक लाभ इत्यादी माहिती घेण्यात आली असून नोकरी मिळाली असल्यास

(१) शैक्षणिक पात्रता

(२) नोकरीतील हुद्दा

(३) संबंधित नोकरी कधी मिळाली

(४) त्याचप्रमाणे मिळणारे मासिक व वार्षिक उत्पन्न

(५) नोकरी पासूनचे उत्पन्न

(६) शेती पासून मिळणारे उत्पन्न इत्यादी माहिती घेण्यांत आली आहे

क्षेत्रीय पाहणी करण्यासाठी सांख्यिकी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली एक पथक तयार करण्यात आले होते. सदर पथकामध्ये दोन संशोधन सहाय्यक व एक अन्वेषक यांचा समावेश होता. या पथकाने ठाणे जिल्हयातील शहापूर प्रकल्पांतर्गत शहापूर तालुका व जव्हार प्रकल्पांतर्गत वाडा तालुका तसेच डहाणू प्रकल्पातील पालघर तालुक्यातील प्रकल्प / उद्योग यांचे सर्वेक्षण केले आहे. पथकाने केलेल्या क्षेत्रीय सर्वेक्षणाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. २.१**

| अ. क्र. | प्रकल्पाचे नांव | तालुका | भरलेल्या प्रपत्रकांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रकल्प/उद्योग | सामाजिक कार्यकर्ता | एकूण लाभार्थी (कामगार) |
| १. | शहापूर | शहापूर | १७ | ५ | ३८ |
| २. | जव्हार | वाडा | ६ | - | १२ |
| ३. | डहाणू | पालघर | १ | - | १ |
| एकूण | | | २४ | ५ | ५१ |

या मुल्यमापन पाहणीसाठी ठाणे जिल्हयातील तीन प्रकल्पांतर्गत तीन तालुक्यातील २४ प्रकल्प/उद्योगांची ५ सामाजिक कार्यकर्त्यांची व ५१ लाभार्थी (कामगार) यांची माहिती घेण्यांत आली आहे.

* * *

## प्रकरण - ३

## सध्याचे औद्योगिक धोरण

### ३.१ उद्योगांचे महत्व :-

राज्याच्या आर्थिक विकासामध्ये उद्योगधंदे महत्वाची भुमिका बजावत असतात. औद्योगिक विकासामध्ये महाराष्ट्र हे देशामध्ये आघाडीचे राज्य आहे. राष्ट्राच्या एकूण औद्योगिक उत्पन्नापैकी २०% औद्योगिक उत्पादन हे महाराष्ट्र राज्यामधील असल्याचे दिसून येते.

वार्षिक औद्योगिक सर्व्हेक्षण (२००१-०२) नुसार महाराष्ट्र राज्याचे औद्योगिक उत्पादनातील पहिला नंबर टिकवून ठेवला असून, महाराष्ट्र राज्यांचे औद्योगिक उत्पादन २०.४ % असल्याचे खालील तक्तावरुन दिसून येते.

तक्ता क्र. ३.१




आधार :- महाराष्ट्राचे आर्थिक सर्व्हेक्षण २००३-०४

(ASI २००१-०२ (अस्थायी)

उद्योगधंदयाचे महत्व वाढविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने उदारमतवादी (व्यापक) धोरण अवलंबिविलेले आहे.

## २.२ औद्यागिक धोरण :-

भारत सरकारने जुलै १९९१ मध्ये औद्योगिक धारेण जाहिर केल्याप्रमाणे शासनाचे औद्योगिक धोरण उदारमतवादी व व्यापक स्वरुपाचे आहे. ते जागतिक अर्थव्यवस्थेला पूरक असे आहे. भारत सरकारने (केंद्रशासनाने) त्या दृष्टिने औद्योगिक धोरण राबविण्यास सन २००३-०४ पासून सुरवात केलेली आहे.

### महाराष्ट्र शासनाचे औद्योगिक धोरण :-

महाराष्ट्र औद्योगिक धोरण २००१ चे उद्दिष्ट असे आहे की, उद्योग धंदयामध्ये गुंतवणूकीचा वेग वाढविणे व माहिती तंत्रज्ञान,जैविक तंत्रज्ञानावर आधारीत मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे राज्यातील औद्योगिक क्षेत्राकडून होणारी निर्यात वाढविणे व योजनाबध्द रितीने मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे. या धोरणाचा उद्देश असा आहे की सातत्याने औद्योगिक क्षेत्राची वाढ करणे. विक्रीकरावर आधारीत प्रोत्साहनात्मक औद्योगिक क्षेत्राची वाढ करणे, उच्च तंत्रज्ञानाद्वारे उद्योगांची वाढ करणे प्रोत्साहनाद्वारे उद्योगधंदयातील स्पर्धा वाढवून प्रगती साधणे.

### महाराष्ट्र राज्य औद्योगिक धोरण २००१ ची वैशिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. प्रोत्साहन देण्याच्या नविन योजनेतंर्गत राज्यात मागासलेल्या भागात नव्याने सुरु होणा-या उद्योगांना लाईट बील, स्टॅम्प डयुटी, रजिस्ट्रेशन फी, जकात कर व प्रवेश करात सुट देण्यांत येते.

२. राज्यातील मागासलेल्या भागात नव्याने सुरु होणा-या लघु उद्योगांना विशेष भांडवल पुरविणे,तसेच नविन कापड होजिअरी व विणकाम लघु उद्योगाना व्याजात सुट देणे .

३. सर्व खादी व ग्रामोद्यांगाना विक्री करातून सुट देणे.

४. माहिती तंत्रज्ञान उद्योगातील उत्पादनास कमीत कमी विक्रिकर आकारणे.

५. आजारी लघु उद्योगाचे थकबाकीचे पुर्ननियोजन करणे.

६. राज्यातील वेगवेगळ्या १२ ठिकाणी स्वयंपूर्ण औद्योगिक वसाहत स्थापन करणे .

७. अपारंपारीक विज स्त्रोतांचा विकास करणे.

८. विशेष आर्थीक क्षेत्र निर्माण करणे.

९. औद्योगिक भागात {क्षेत्रात} राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक व संशोधनात्मक संस्थांना कमी दराने जमिनी पुरविणे.

१०. नविन विज पुरवठयासाठी परवानगी देणे.

११. मुंबईतील कापड गिरण्याच्या जागेवर माहिती तंत्रज्ञान व जैविक तंत्रज्ञान उद्योगांची स्थापना करणे.

१२. माहिती तंत्रज्ञान उद्योगांना जादा एफ.एस.आय. देणे. औद्योगिक क्षेत्राची वाढ होण्यासाठी तसेच समतोल प्रादेशिक विकास होण्यासाठी विविध प्रोत्साहनात्मक मूलभूत बदल करण्याच्या आर्थीक सुधारणा स्विकारण्याचे राज्य सरकारचे धोरण आहे. त्यानुसार दिनांक १.४.२००१ पासून राज्यामध्ये नविन प्रोत्साहन देण्याची योजना लागू केलेली आहे.

## २.३ मागासलेल्या भागातील उद्योगधंदयाना सध्या अस्तित्वात असलेल्या औद्योगिक सुविधा

ग्रामीण आणि मागासलेल्या भागात उद्योगधंदयाचे विक्रेद्रीकरण करण्याच्या शासनाच्या नविन धारेणाने महत्वाची भुमिका बजावली आहे. मागासलेल्या भागातील उद्योगाना सध्या शासन खालीलप्रमाणे सोयी सुविधा पुरविते.

### प्रोत्साहनात्मक योजना :-

३१ मार्च,२००१ पासून महाराष्ट्र शासनाच्या उद्योग उर्जा व कामगार खात्याने खालीलप्रमाणे प्रोत्साहनात्मक योजना लागू केली आहे. प्रोत्साहनात्मक सोयी सुविधा देण्यासाठी राज्यातील औद्योगिक क्षेत्राचे खालीलप्रमाणे विभाग पाडण्यात आलेले आहेत.

१. विभाग अ :- यामध्ये सुधारलेल्या क्षेत्राचा उदा. मुंबई शहरी विभाग व पुणे शहरी विभाग यांचा समावेश होतो.

२. विभाग ब :- या क्षेत्रामध्ये काही औद्योगिक सुधारणा झालेल्या आहेत. अशा क्षेत्राचा समावेश होतो.

३. विभाग क :- वरिल विभाग ब मधिल औद्योगिक सुधारणापेक्षा कमी सुधारणा झालेले क्षेत्र.

४. विभाग ड :- विभाग अ,ब व क विभागातील क्षेत्रापेक्षा कमी सुधारणा झालेले क्षेत्र.

५. विभाग ड + :- वरील विभाग अ,ब,क व ड मध्ये समाविष्ठ न झालेले कमीत कमी सुधारणा झालेले क्षेत्र.

६. उद्योगधंदे नसलेले क्षेत्र

मागासलेल्या भागातील उदयोगधंदयाना प्रोत्साहन दिले जाते. त्या तालुक्याचे महाराष्ट्र शासनाने तालुकावर वर्गीकरण केलेले आहे ते खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ३.२**

| अ.क. | जिल्हयाचे नांव | तालुक्याचे वर्गीकरण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | ड | ड + |
| १. | ठाणे | वसई<br>भिवंडी | डहाणू<br>पालघर<br>मुरबाड | शहापूर | -- | तलासरी,<br>जव्हार,<br>वाडा,<br>मोखाडा<br>विक्रमगड |
| २. | रायगड | खालापूर<br>पनवेल | पेण<br>सुधागड<br>रोहा | कर्जत | -- | -- |
| ३. | पुणे | -- | मावळ | जुन्नर<br>खेड | -- | आंबेगांव |
| ४. | नाशिक | नाशिक | -- | सिन्नर<br>बागलाण | इगतपूरी | दिंडोरी,<br>पेठ,<br>कळवण<br>सुरगाना<br>चांदवड |
| ५. | अहमदनगर | -- | संगमनेर | अकोले | -- | -- |
| ६. | जळगांव | -- | -- | -- | यावल<br>रावेर | चोपडा |
| ७. | नंदूरबार | -- | -- | -- | तळोदा<br>शहादा | अक्राणी<br>अक्कलकुवा<br>नंदूरबार<br>नवापूर |

| अ.क. | जिल्हयाचे नांव | तालुक्याचे वर्गीकरण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | ड | ड + |
| ८. | धुळे | -- | -- | -- | साक्री, शिरपूर | -- |
| ९. | नांदेड | -- | -- | -- | -- | किनवट<br>हद्‌गांव<br>भोकर |
| १०. | हिंगोली | -- | -- | -- | हिंगोली<br>औढा-नागनाथ<br>कळमनुरी | -- |
| ११. | अमरावती | -- | -- | -- | धारणी<br>वरुड<br>मोरसी | चिखलदारा<br>अचलपूर |
| १२. | वासिम | -- | -- | -- | माळेगांव<br>मानोरा | -- |
| १३. | अकोला | -- | -- | -- | अकोट<br>तेल्हारा<br>पातुर | -- |
| १४. | बुलढाणा | -- | -- | -- | जळगांव-जामोद<br>संग्रामपूर<br>मेहकर | -- |
| १५. | यवतमाळ | -- | -- | -- | मारेगाव, यवतमाळ,<br>कळंब, शेणेगांव,<br>बाभुळगांव,<br>केळापूर,<br>घाटंजी,<br>उंबरखेड,<br>महागांव,<br>नेर, दिग्रस,<br>आर्णी<br>झरीजामनी | वनी,पुसद,<br>दारव्हा. |

| अ.क. | जिल्हयाचे नांव | तालुक्याचे वर्गीकरण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | ड | ड + |
| १६. | नागपूर | -- | -- | -- | रामटेक<br>नरखेड<br>पारासिवनी | काटोल<br>उमरेड<br>सावनेर |
| १७. | वर्धा | -- | -- | -- | सेलू<br>आर्वी<br>कारंजा<br>समुद्रपूर | -- |
| १८. | भंडारा | -- | -- | -- | साकोली<br>तुमसर | -- |
| १९. | गोंदिया | -- | -- | -- | अर्जुनी -<br>मोरगांव<br>सडक अर्जुनी<br>साळेकसा<br>खामगांव<br>गोरेगांव<br>गोंदीया | देवरी,तिरोरा |
| २०. | गडचिरोली | -- | -- | -- | -- | गडचिरोली,<br>चामोर्शी,<br>आरमोरी,<br>वडसा,<br>(देसाईगंज ) धानोरा,<br>कोर्ची,<br>कुरखेडा,<br>अहेरी,<br>शिरोचा,<br>मुलचेरा,<br>एटापल्ली,<br>भामरागड |

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | तालुक्याचे वर्गीकरण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | ड | ड + |
| २१. | चंद्रपूर | -- | -- | -- | चंद्रपूर, कोरपना, सावली, शिंदेवाही गोंडपिंपरी,बल्हारपूर पोंभुर्णी ,चिमूर, भद्रावती, नागोभिड, ब्रम्हपूरी | राजोरा,मूळ वरोरा |
| | एकुण | ५ | ८ | ७ | ६० | ४४ |

तक्ता क्र. ३.३



वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, एकूण १२४ आदिवासी तालुक्यापैकी ५ तालुके (४.०३ %)अ विभागात, ८ तालुके (६.४५ %) ब विभागात, ७ तालुके (५.६५ %) क विभागात येतात. तर ६० तालुके (४८ %) ड विभागात समाविष्ट आहेत राहिलेले ४४ तालुके (३५%) ड + या विभागात समाविष्ट आहेत. याचा अर्थ आदिवासी भागातील १२४ तालुक्यापैकी १०४ (८४ % ) तालुके औद्योगिक करणामध्ये मागासलेले आहेत.

## लघु उद्योगांना प्रोत्साहनपर विशेष भांडवल पुरविणे

१. १ एप्रिल,२००१ नंतर सुरु झालेल्या लघु उद्योग व नविन सुरु होणा-या उद्योगांना विशेष भांडवल पुरविले जाते. त्याचा दर खाली दर्शविल्याप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ३.४**

| विभाग | स्थिर भांडवल गुंतवणुकीचे प्रमाण | प्रोत्साहनपर रक्कम (रु. लाखात ) |
|---|---|---|
| क | २० | १० |
| ड | ३० | २० |
| ड+ | ३५ | २५ |
| उद्योग विरहित जिल्हे | ४० | ३५ |

१. विशेष भांडवल पात्र, उद्योगांना, पाच वर्षापर्यत समान हप्त्यामध्ये दिले जाते उदा. एखादा पात्र उद्योग ड विभागात समाविष्ठ असेल तर त्याला १जानेवारी,०२ पासून विशेष प्रोत्साहनपर भांडवल दिले जाते. जर उद्योगांची स्थिर भांडवल गुंतवणुक १००/- रुपये असेल तर त्या उद्योगांस विशेष भांडवल रु. २०/- दिले जाते. पात्र उद्योगांस रु. १२/- प्रमाणे प्रोत्साहनपर रक्कम दिली जाते.

२. विशेष प्रोत्साहनपर भांडवल हे अनुदान म्हणून दिले जाते. एखादया उद्योगाने सर्व आवश्यक व अंतिम बाबींची परिणामकारकरित्या पुर्तता केल्यानंतरच तो उद्योग प्रोत्साहनपर रक्कम घेवु शकतो आणि त्या उद्योगाने सर्व बाबींची पुर्तता केली किंवा नाही हे त्या उद्योगाने स्थिर भांडवलाची गुंतवणुक किती केली आहे त्यावरुन ठरविले जाते.

## नवीन कापड उद्योग, तयार कपडे बनविणारे उद्योग, होजीअरी आणि विणकाम करणारे उद्योगांना व्याज अनुदान :-

१. १ एप्रिल, २००१ नंतर सुरु झालेले नवीन कापड उद्योग, तयार कपडे बनविणारे उद्योग, होजीअरी आणि विणकाम करणारे उद्योग यांनी लघुउद्योग

सुरु करण्यासाठी घेतलेल्या कर्जावर त्यांनी वित्तीय संस्थांना / बँकाना जेवढे व्याज देय आहे. तेवढी रक्कम अनुदान स्वरुपात दिली जाते.

२. व्याज अनुदान, हे त्या लघुउद्योगाने प्रति वर्षी ५ % दराने वित्तीय संस्थेस प्रत्यक्षात दिलेल्या व्याजाएवढे असते. तथापी थकीत व्याजाचे हप्ते, त्या उद्योगाने दिले असतील. तर व्याज अनुदान दिले जात नाही.

३. लघु उद्योगाने कार्यान्वयीन यंत्रणेस आर्थिक वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याचे आत त्यांचा मागणी अर्ज वित्तीय संस्थेच्या / बँकेच्या देय असलेल्या रक्कमेच्या कागदपत्रासह सादर करावा लागतो.

४. व्याज अनुदान मिळण्याचा पात्र कालावधी व जास्तीत जास्त अनुदानाची मर्यादा याची माहिती खालील तक्त्यामध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्रं. ३.५**

| तालुका / वर्गीकृत विभाग | पैशाची मर्यादा (रुपये लाखात ) | पात्रतेचा जास्तीत जास्त कालावधी (वर्षामध्ये ) |
|---|---|---|
| क | १० | ४ |
| ड | २० | ५ |
| ड+ | २५ | ६ |
| उद्योग विरहित जिल्हे | ३५ | ७ |

**जकाती ऐवजी प्रवेश शुल्क :-**

१. एखादया पात्र उद्योगाने व्यावसायीक उत्पादन सुरु केल्यानंतर, त्या उद्योगास स्थानिक प्राधीकरणाने जकात लेव्ही इ. स्वरुपात खर्च केला असेल तर अशा पात्र उद्योगास १०० % भांडवली गुंतवणुकीवर अनुक्रमे ५,७,९,व १२ वर्षापर्यंत ब,क,ड व ड + या क्षेत्रात जकातीचा परतावा देण्यांत येतो. उद्योग विरहित जिल्हयास, सदर सवलत १५ वर्ष मुदतीपर्यंत देता येते.

२. जकात,लेव्ही व इतर कराच्या रक्कमेचा परताव्याचा कालावधी उद्योगाने व्यवसायिक उत्पादन सुरु केल्याच्या तारखेपासून असतो. तथापी EOU किंवा कृषी उद्योग यांस जकात परताव्याची रक्कम उद्योगास कराव्या लागलेल्या पहिल्या आयातीच्या तारखेपासून गणण्यांत येते.

३. जकात परताव्याची प्रोत्साहनात्मक रक्कम IEM/LOI / SSI नोंदणीधारक नवीन इलेक्ट्रॉनिक उद्योगास देता येते. परंतू हे उद्योग MMR व PMR क्षेत्रात असणे आवश्यक असून सदर सवलत ५ वर्ष कालावधीसाठी देण्यात येते.

## विजकर सवलत

क,ड,ड+, व उद्योग विरहित जिल्हयातील पात्र उद्योगांना विज करापासून १५ वर्ष सुट देण्यांत येते. राज्याच्या इतर भागात निर्यातक्षम माहिती तंत्रज्ञान विषयक जैविक तंत्रज्ञान विषयक, उद्योग आणि विशेष आर्थीक इलेक्ट्रॉनिक हार्डवेअर टेक्नॉलॉजी पार्क यांना विज करातून १० वर्ष सुट देण्यांत येते.

## महाराष्ट्र शासनाच्या मागास भागातील किंवा आदिवासी भागातील उद्योग धंदयाचा आदिवासीना लाभ होण्यासाठी मार्गदर्शक सुचना.

मागास भागातील औद्योगिक विकासाचा लाभ मागास भागातील आदिवासीना होण्यासठी महाराष्ट्र शासनाने, स्थानिक आदिवासीना, नोक-यामध्ये प्राधान्य देण्याविषयी मार्गदर्शक सुचना जारी केल्या आहेत.

उद्योग धंदयातील भरतीचेवेळी पर्यवेक्षिय व इतर विभागातील नोक-यामध्ये स्थानिक लोकांना प्राधान्य देण्यांत यावे. पर्यवेक्षिय नोक-यामध्ये ५० % व इतर नोक-यामध्ये उदा. कामगार इ. ८० % प्राधान्य देण्यांत यावे. अशा शासनाच्या सुचना आहेत. तर व्यवस्थापकिय कामासाठी टक्केवारी नक्की केलेली नाही. तसेच वरील धोरणासाठी शासनाने कायदेशीर बंधने कारखानदारावर घातलेली नाहीत.

स्थानिक लोकांना किती नोक-या मिळाल्या, याची माहिती जिल्हा उद्योग केंद्राकडून, इएलपी-१ व २ या फॉर्ममध्ये गोळा केली जाते. प्रत्येक कारखानदाराने फॉर्म इएलपी-१ मध्ये माहिती सादर करावयाची असते. या फॉर्ममध्ये स्थानिक लोक व इतर लोकांना व्यवस्थापकिय व इतर व्यवसायामध्ये किती नोक-या मिळाल्या याची वेगवेगळी माहिती असते. वरील माहितीच्या आधारे जिल्हा उद्योग केंद्राकडून स्थानिक आदिवासीना किती नोक-या मिळाल्या याची माहिती घेतली जाते व स्थानिक व आदिवासी लोकांचे नोक-यातील प्रमाण वाढविण्यासाठी पाठपुरावा केला जातो.

* * *

# प्रकरण -४

## क्षेत्रीय पाहणी

क्षेत्रीय पाहणी करण्यासाठी ठाणे जिल्हा निवडण्यात आला होता. ठाणे जिल्हयातील (१) शहापूर (२) वाडा (३) पालघर या तालुक्यातील प्रकल्प/उद्योगांची पाहणी करण्यात आली आहे. या तीन तालुक्यातील तालुकानिहाय प्रकल्प/उद्योगाची संख्या व उद्योगामध्ये होणारे उत्पादन याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

### (१) प्रकल्प/उद्योगांची संख्या

| अ. क्र. | तालुका | प्रकल्प/ उद्योग संख्या | उद्योग व्यवसायाच्या स्वरुपानुसार वर्गीकरण | | | | | | | | | | सेवा उद्योग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्टील | प्लॅस्टीक | टायर | आयु-वेंदिक | इलेक ट्रीक | रेफ्रि जरे टर | तयार कपडे | कॉस्मे टीक्स | सिमेंट (RCC) पाईप | स्टोन कटर | एम्ब्रॉ यडरी |
| १. | शहापूर | १७ | ५ | ५ | - | १ | २ | १ | - | १ | - | - | २ |
| २. | वाडा | ६ | २ | - | १ | - | - | - | १ | - | १ | १ | - |
| ३. | पालघर | १ | - | १ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | एकुण | २४ | ७ | ६ | १ | १ | २ | १ | १ | १ | १ | १ | २ |
| | शे.प्रमाण | १०० | २९ | २५ | ४ | ४ | ९ | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ९ |

एकूण २४ प्रकल्प/उद्योगांची क्षेत्रीय पाहणी करण्यात आली असून त्याची तालुकावार छोटे/मोठे कारखाने (१) शहापूर-१७ (२) वाडा ६ (३) पालघर-१ याप्रमाणे आहेत. कारखान्यांच्या उत्पादनानुसार वर्गीकरण केले असता सर्वात जास्त स्टील उद्योगाची संख्या ७ आहे. त्या खालोखाल प्लॅस्टिक उद्योगाची संख्या ६ इतकी आहे. इलेक्ट्रीक उद्योगाची संख्या २ आहे. टायर, आयुर्वेदिक, रेफ्रिजेटर, तयार कपडे, कॉस्मॅटीक्स, सिमेंट पाईप (आरसीसी) तसेच स्टोन कटर प्रत्येकी एकेक उद्योग आहे. तसेच सेवा उद्योगामध्ये एम्ब्रॉयडी उद्योगाची संख्या २ इतकी आहे. औद्योगिक दृष्टया मागासलेल्या वर्गवारीमध्ये शहापूर तालुका "क" वाडा तालुका "ड +" आणि पालघर तालुका "ब" वर्गीकरणात समाविष्ट आहेत.

### (२) उद्योगातील कामगार संख्या

प्रकल्प/उद्योगामध्ये काम करणाऱ्या कामगारांची माहिती खालील तक्त्यात देण्यात आली असून तालुकावार उद्योग संख्या व त्यातील कामगारांची संख्या याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

## तक्ता क्र. ४.२

## कर्मचारी/कामगार माहिती

| अ. क्र. | तालुका | प्रकल्प/ उद्योग संख्या | सर्वसामान्य वर्ग | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | व्यवस्थापक | पर्यवेक्षक | कुशल | अकुशल | एकूण |
| १. | शहापूर | १७ | २९७ | १९३ | ६७१ | ४४५ | १६०६ |
| २. | वाडा | ६ | ८ | २१ | ५०४ | ३२१ | ८५४ |
| ३. | पालघर | १ | २ | ४ | १३ | २८ | ४७ |
| एकूण | | २४ | ३०७ | २१८ | ११८८ | ७९४ | २५०७ |

वरील कामगारांची संख्या ही प्रकल्प/उद्योगामध्ये कायम स्वरुपी काम करणाऱ्या कामगारांची संख्या आहे. तथापि प्रकल्प/उद्योगामध्ये कायम कामगारांपेक्षा ठेकेदारी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांची संख्या जास्त असल्याचे निदर्शनास आले आहे.

**प्रकल्प उद्योगांची नोंदणी :-**

एकूण २४ प्रकल्प/उद्योगांची पहाणी करण्यात आली आहे. त्या २४ प्रकल्प/उद्योगाची नोंदणी कोणत्या कायद्यान्वये झाली आहे. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

## तक्ता क्र. ४.३

## प्रकल्प/उद्योगांच्या नोंदणीच्या प्रकारानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | तालुका | कंपनी कायदा १९५६ | कंपनी कायदा १९६० | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | शहापूर | १५ | २ | १७ |
| २. | वाडा | ६ | - | ६ |
| ३. | पालघर | - | १ | १ |
| एकूण | | २१ | ३ | २४ |

वरील २४ प्रकल्प/उद्योगापैकी २१ (८८ %) प्रकल्प उद्योगांची नोंदणी कंपनी कायदा १९५६ नुसार झाली असून, उर्वरित ३ (१२ %) प्रकल्प उद्योगांची नोंदणी भागीदारी कायदा १९६० नुसार झालेली आहे.

काही प्रकल्प/उद्योगामधील कामगारांची माहिती प्रत्यक्ष गांवात जाऊन घेण्यात आली आहे. ती माहिती खालीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र. ४.४

गांवात जाऊन प्रपत्रे भरण्यात आलेल्या कामगारांची संख्या

| अ. क्र. | तालुका | गावाचे नांव | माहिती घेतलेल्या कामगारांची संख्या | गांवाची लोकसंख्या | गांवातील कुटूंब संख्या | कामगारांची जमात / जात | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | हिंदू | | | | |
| | | | | | | तेली | आगरी | कुणबी | ठाकूर | एकूण |
| १. | शहापूर | १.आडगांव | ६ | ३६२४ | ५५० | १ | १ | ४ | - | ६ |
| | | २.मंडूरपाडा | ५ | २४० | ४० | - | - | - | ५ | ५ |
| | | ३.पेंढारघोळ | ९ | ३५० | ११० | - | - | - | ९ | ९ |
| एकूण | | | २० | ४२१४ | ७०० | १ | १ | ४ | १४ | २० |

एकूण २० कामगारांची माहिती घेण्यात आली आहे. त्यातील ६ कामगार आटगांव गांवचे लाहेगांव अंतर्गत मंडूर पाडयाचे ५ व पेंढारघोळ गांवचे ९ कामगार आहेत. जमातीनिहाय कामगारांचे वर्गीकरण केले असता सर्वात जास्त १४ कामगार ठाकूर जमातीचे ४ कामगार कुणबी व प्रत्येकी एक कामगार तेली व आगरी जातीचे आहेत.

## प्रकल्प/उद्योगामध्ये कामावर जाण्यास वापरणाऱ्या साधनानुसार कामगारांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

### तक्ता क्र. ४.५

### प्रकल्प/उद्योगामध्ये कामावर जाण्यास वापरणाऱ्या साधनानुसार वर्गीकरण

**तालुका :- शहापूर**

| अ. क्र. | गावाचे नांव | काम-गारां-ची संख्या | नोकरीत कायम नसणारे कामगार | कामावर जाताना वापरण्यात येणारे वाहन प्रकार | | | | | शैक्षणिक पात्रता | | शेती अस-णारे काम-गार | शेती नस-णारे काम-गार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पायी | साय कल | मोटार बाईक | एस टी | रेल्वे | साक्षर | निर - क्षर | | |
| १. | आड-गांव | ६ | ६ | ५ | - | १ | - | - | ५ | १ | ४ | २ |
| २. | मंडूर-पाडा | ५ | ५ | २ | - | - | - | ३ | ५ | - | ४ | १ |
| ३. | पेंढार-घोळ | ९ | ९ | १ | ६ | - | २ | - | ९ | - | ८ | १ |
| एकूण | | २० | २० | ८ | ६ | १ | २ | ३ | १९ | १ | १६ | ४ |

एकूण २० कामगारांची पत्रके भरण्यात आलेली आहेत. ते सर्व कामगार नोकरीत कायम नसणारे (तात्पुरत्या स्वरुपात) कामगार आहेत. २० कामगारांपैकी ८ कामगार पायी, ६ कामगार सायकलने, एक कामगार मोटारसायकलने तर दोन कामगार एसटीने कामावर जातात व तीन कामगार रेल्वेने (लोकल) कामावर जातात.

कामगारांचे गांवापासून नोकरीवर (प्रकल्प/उद्योग) जाण्याचे अंतर दर्शविणारा तक्ता

**तक्ता क्र.४.६**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | अंतर कि.मी.मध्ये | | | | लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २ ते ३ | ४ ते ५ | ६ ते १४ | १५ ते १६ | संख्या |
| १. | ठाणे | शहापूर | १२ | ५ | - | ३ | २० |
| **शेकडा प्रमाण** | | | ६०% | २५% | - | १५% | १००% |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, २० कामगारांपैकी १२ कामगार २ ते ३ कि.मी.अंतरावरुन कामावर येतात. ५ कामगार ४ ते ५ कि.मी.वरुन कामावर येतात. तर ३ कामगार १५ ते १६ कि.मी.वरुन कंपनीमध्ये कामावर येतात.

सर्वेक्षण केलेल्या कामगारांची साक्षरतेनुसार वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.४.७**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | साक्षरतेची वर्गवारी | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | निरक्षर | १ ली ते ४ थी | ५ वी ते ७ वी | ८ वी ते १० वी | ११ वी ते १२ वी | पदवी धारक | |
| १. | ठाणे | शहापूर | १ | १ | ७ | ९ | १ | १ | २० |
| **शेकडा प्रमाण** | | | ५% | ५% | ३५% | ४५% | ५% | ५% | १००% |

वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, २० कामगारांपैकी १ कामगार निरक्षर आहेत. १ कामगार इ.४ थी पर्यंत शिकलेला आहे. ७ कामगार ५ वी ते ७ वी पर्यंत शिकलेले आहेत. तर ९ कामगार ८ वी ते १० पर्यंत शिकलेले आहेत. १२ वी पर्यंत एक व पदवीपर्यंत १ कामगार शिकलेला आहे.

आटगांव,मंडुरपाडा व पेंढारघोळ या गावातील कारखान्यात काम करित असलेल्या कामगारांची शेती व नोकरीपासून मिळणा-या उत्पन्नाची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**उत्पन्नाची माहिति**

**तक्ता क्र.४.८**

| जिल्हा | तालुका | अ.क्र. | जमीन | | जमिनी पासून मिळणारे उत्पन्न रुपये | नोकरीपासून मिळणारे उत्पन्न रुपये | एकूण उत्पन्न रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | हेक्टर | आर | | | |
| ठाणे | शहापूर | १. | ० | ० | ० | २१६०० | २१६०० |
| | | २. | ० | ० | ० | ४५००० | ४५००० |
| | | ३. | ० | २० | १५०० | २१६०० | २३१०० |
| | | ४. | ३ | ०० | १५००० | ६८४०० | ८३४०० |
| | | ५. | ० | ४० | ९००० | १९२०० | २८२०० |
| | | ६. | ७ | ० | १९००० | २१६०० | ४०६०० |
| | | ७ | ० | ० | ० | १६८०० | १६८०० |
| | | ८. | ४ | ० | १५००० | १८००० | ३३००० |
| | | ९. | ६ | ० | १५००० | १८००० | ३३००० |
| | | १०. | -- | ० | १०००० | १५००० | २५००० |
| | | ११. | ५ | ० | ८००० | १८००० | २६००० |
| | | १२. | १ | २० | ११००० | २१७५० | ३२७५० |
| | | १३. | ३ | ० | ९००० | २५९२० | ३४९२० |
| | | १४. | ० | ३० | ४००० | ३२४०० | ३६४०० |
| | | १५. | ५ | ० | ९६०० | १८००० | २७६०० |
| | | १६. | २ | ० | २८८०० | ५००० | ३३८०० |
| | | १७. | २ | ० | ११००० | ३०६०० | ४१६०० |
| | | १८. | ० | ० | ० | २६४०० | २६४०० |
| | | १९. | ० | १५ | १००० | १६८०० | १७८०० |
| | | २०. | ० | २० | १५००० | २४००० | ३९००० |
| **एकूण** | | | ६५ | ४५ | १,८१,९०० | ४,८४,०७० | ६,६५,९७० |
| **उत्पन्नाचे शेकडा प्रमाण** | | | | | २७% | ७३% | १००% |

एकूण २० कामगारांकडे ६५ हेक्टर, ४५ आर शेती असून त्यांचे शेतीपासून मिळणारे उत्पन्न रु.१,८१,९००/- (२७%) आहे. तर नोकरीपासून मिळणारे उत्पन्न रु.४,८४,०७०/- (७३%) असल्याचे दिसून येते.२० कामगारापैकी सर्वात जास्त उत्पन्न ६८,४००/- आहे. त्यांनतर

४५,०००/- व ३२,४००/- याप्रमाणे आहे. सर्वात कमी ५,०००/- रुपये आहे. या कामगाराला २ हेक्टर जमिन आहे. म्हणून कारखान्यामध्ये काम करण्याची याला तितकीशी गरज नसल्याचे दिसून येते. **जमिन नसलेल्या ४ कामगारांचे उत्पन्न रुपये १६,८००/-, २१,६००/- , २६,४००/- व रुपये ४५,०००/- आहे.** उत्पन्नातील तफावत २०,०००/- ते ४०,०००/- दरम्यान आहे. एवढी तफावत असण्याचे कारण म्हणजे नियमितपणे कामावर न जाण्याची प्रवृत्ती कामगारामध्ये असल्याचे निदर्शनास आले आहे.

उत्पनानुसार वार्षिक उत्पन्नाची वर्गवारी दर्शविणारा तक्ता

**तक्ता क्र ४.९**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | वार्षिक उत्पन्न रुपये | लाभार्थी संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | शहापूर | १५,००० - २००० | २ | १० |
| | | | २०,००१ - २५,००० | ३ | १५ |
| | | | २५,००१ - ३०,००० | ४ | २० |
| | | | ३०,००१ - ३५,००० | ५ | २५ |
| | | | ३५,००१ - ४०,००० | २ | १० |
| | | | ४०,००१ - ४५,००० | ३ | १५ |
| | | | ४५,००१ - चे वर | १ | ५ |
| एकूण | | | | २० | १००% |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, २० कामगारांपैकी ५ कामगारांचे उत्पन्न ३०,००० ते ३५,००० रु.च्या दरम्यान आहे. आणि ५ कामगारांचे उत्पन्न रु.३५,००० ते ४५,००० दरम्यान आणि आणि ९ कामगारांचे उत्पन्न रु.१५,००० ते ३०,००० च्या दरम्यान आहे. तर फक्त एक कामगाराचे वार्षिक उत्पन्न रु.४५,०००/- पेक्षा जास्त आहे. तर रु.२०,०००/- च्या आत उत्पन्न असणारे २ कामगार आहेत.

रु.१५,००० ते ३०,०००/- रक्कमेच्या दरम्यान उत्पन्न असलेले कामगार ९ असून यात एकूण कामगारांपैकी ४५% कामगार आहेत. रु.३०,००० ते ३५,००० दरम्यान उत्पन्न असणारे कामगार ५ असून त्याची टक्केवारी २५ आहे. रु.३५,०००/-ते ४५,००० उत्पन्न असणारे कामगारही ५ असून याची टक्केवारी २५ आहे आणि ४५,००० हून जादा उत्पन्न असणारा कर्मचारी फक्त एक असून त्याची टक्केवारी ५ आहे.

## प्रकल्प /उद्योगामध्ये पत्रके भरलेल्या कामगारांची जात/जमातनिहाय वर्गीकरण

प्रकल्प/उद्योगाचे क्षेत्रीय पाहणीमध्ये २० कामगारांची पत्रके त्यांचे घरी जाऊन भरलेली आहेत. त्याचबरोबर ५१ कामगारांची पत्रके त्यांचे प्रकल्प /उद्योगामध्ये जाऊन भरुन घेतलेली आहेत. त्याची माहिती खालील तक्त्यामध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र.४.१०**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | | | सर्वेक्षण केलेल्या लाभार्थींच्या जाती/ जमातीचे नांव | सर्वेक्षण केलेले लाभार्थी कामगार | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शहापूर | वाडा | पालघर | | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| | | आदिवासी | | | | | | |
| १. | ठाणे | - | ११ | - | मल्हार कोळी | ७ | ४ | ११ |
| २. | | १० | - | - | महादेव कोळी | १० | - | १० |
| ३. | | १२ | - | - | म.ठाकूर | १२ | - | १२ |
| ४. | | २ | १ | १ | वारली | ३ | १ | ४ |
| ५. | | ३ | - | - | कातकरी | ३ | - | ३ |
| एकूण | | २७ | १२ | १ | आदिवासी | ३५ | ५ | ४० |
| | | बिगर आदिवासी | | | | | | |
| ६. | | ३ | - | - | मराठा | ३ | - | ३ |
| ७. | | २ | - | - | कुणबी | - | २ | २ |
| ८. | | २ | - | - | वैश्यवाणी | १ | १ | २ |
| ९. | | १ | - | - | धनगर | - | १ | १ |
| १० | | १ | - | - | चांभार | - | १ | |
| ११ | | १ | - | - | कुंभार | १ | - | १ |
| १२ | | १ | - | - | आगरी | - | १ | १ |
| एकूण | | ११ | - | - | **बिगर आदिवासी** | ५ | ६ | ११ |
| कुल एकूण | | ३८ | १२ | १ | आदिवासी व बिगर आदिवासी एकुण | ४० | ११ | ५१ |

वरील तक्त्यावरुन उसे निदर्शनास येते की, एकूण ५१ कामगारांपैकी ४० (७८%) कामगार आदिवासी जमातीचे आहेत. तर ११ (२२%)कामगार इतर जातीचे आहेत.

आदिवासी कामगारांपैकी सर्वात जास्त १२ कामगार म. ठाकूर, ११ कामगार मल्हार कोळी व १० कामगार महादेवकोळी या जमातीचे आहेत. तर वारली व कातकरी जमातीचे कामगार अनुक्रमे ४ व ३ आहेत.

एकूण ४० आदिवासी कामगारांपैकी ३५ (८७%) पुरुष कामगार आहेत. तर ५ (१३%) स्त्री कामगार आहेत. तर एकूण ५१ कामगारामध्ये ४० (७८%) पुरुष कामगार व ११ (२२%) स्त्री कामगार असल्याचे दिसून येते.

सर्वेक्षण केलेल्या लाभार्थींचे नोकरीस लागण्यापूर्वीचे व नोकरीस लागल्यानंतरचे वार्षीक व सरासरी उत्पन्न.

तक्ता क्र. ४.११

| अ. क्र. | तालुका | लाभार्थी संख्या | नोकरीस लागण्यापूर्वीचे वार्षिक उत्पन्न रुपये | सरासरी वार्षिक उत्पन्न रुपये | नोकरी लागल्यानंतरचे वार्षिक उत्पन्न रुपये | सरासरी वार्षिक उत्पन्न रुपये | सरासरी उत्पन्नामध्ये झालेली वाढ रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शहापूर | २८ | ३,९९,५०० | १४,२६८ | ११,१७,०२० | ३९,८९४ | २५,६२६ |
| २ | वाडा | १० | १,६१,५०० | १६,१५० | ३,५८,३०० | ३५,८३० | १९,६८० |
| | एकूण | ३८ | ५,६१,००० | १४,७६३ | १४,७५,३२० | ३८,८२४ | २४,०६१ |

{टिप :- एकूण ५१ लाभार्थींपैकी १३ लाभार्थींचे नोकरी लागण्यापूर्वीचे उत्पन्न, प्रपत्रामध्ये घेण्यात आलेले नाही. त्यामुळे ३८ लाभार्थींच्या माहितीचा तुलनात्मक तक्ता देण्यांत आलेला आहे.}

३८ कामगारांचे नोकरी पूर्वीचे सरासरी वार्षिक उत्पन्न १४,७६३/- रुपये होते. नोकरी लागल्यानंतर वार्षिक उत्पन्न वाढून ते ३८,८२४/- रुपये झालेले आहे. सरासरी उत्पन्नात २४,०६१ रुपये एवढी वाढ झालेली आहे.

## कारखान्यात काम करणा-या कामगारांची तालुकानिहाय व जमातनिहाय शिक्षणानुसार वर्गवारी

तक्ता क्र. ४.१२

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | जाती/ जमातीचे नाव | शिक्षण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अशिक्षित | १ली ते ४थी | ५ वी ते ७वी | ८वी ते १०वी | ११वी ते १२वी | एकूण |
| १ | ठाणे | शहापूर | महादेव कोळी | ३ | १ | - | ६ | - | १० |
| २ | ठाणे | शहापूर | म. ठाकूर | १ | १ | ५ | ५ | - | १२ |
| ३ | ठाणे | शहापूर | कातकारी | १ | - | १ | १ | - | ३ |
| ४ | ठाणे | वाडा | मल्हारकोळी | १ | २ | १ | ४ | ३ | ११ |
| ५ | ठाणे | पालघर | वारली | - | - | - | १ | - | १ |
| | | शहापूर | वारली | १ | - | - | १ | - | २ |
| | | वाडा | वारली | १ | - | - | - | - | १ |
| एकूण | | आदिवासी कामगार | | ८ | ४ | ७ | १८ | ३ | ४० |
| ६ | ठाणे | शहापूर | मराठी | - | - | - | ३ | - | ३ |
| ७ | ठाणे | शहापूर | धनगर | - | - | - | १ | - | १ |
| ८ | ठाणे | शहापूर | चांभार | - | - | - | १ | - | १ |
| ९ | ठाणे | शहापूर | कुणबी | - | - | - | २ | - | २ |
| १० | ठाणे | शहापूर | वैश्यवाणी | - | - | - | २ | - | २ |
| ११ | ठाणे | शहापूर | कुंभार | - | - | - | १ | - | १ |
| १२ | ठाणे | शहापूर | आगरी | | | १ | - | - | १ |
| एकूण | | | बिगर आदिवासी | - | - | १ | १० | - | ११ |
| एकूण आदिवासी व बिगर आदिवासी टक्केवारी | | | | ८ | ४ | ८ | २८ | ३ | ५१ |

प्रकल्प उद्योगातील काम करणा-या कामगारांचे शिक्षणानुसार वर्गीकरण केले असता, ५१ कामगारांपैकी सर्वात जास्त २८ कामगार ८ वी ते १० वी पर्यंत शिकलेले आहेत. तर ५वी ते ७वी पर्यंत शिकलेले ८ कामगार आहेत तसेच पहिली व चौथी शिकलेले व ११वी ते १२वी पर्यंत शिकलेले अनुक्रमे ४ व ३ कामगार असल्याचे दिसून येते.

एकूण ४० आदिवासी कामगारांमध्ये सर्वात जास्त ८वी ते १०वी पर्यंत शिकलेले १८ कामगार असून, ५वी ते ७वी पर्यंत शिकलेले ७ कामगार आहेत. वर १ली ते ४थी व ११वी ते १२वी पर्यंत शिकलेले कामगार अनुक्रमे ४व ३ असल्याचे दिसून येत आहे.

कामगारांनी कारखान्यात केलेल्या नोकरीचा कालावधी

**तक्ता क्र. ४.१३**

| अ क्र | तालुका | कालावधी - वर्ष | | | | | | | | | | | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एक वर्षाचे आत | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | | |
| १ | शहापूर | १२ | ५ | २ | ३ | १ | - | ३ | ३ | ३ | ४ | १ | ३८ | ७४% |
| २ | वाडा | १ | १ | १ | - | ४ | २ | १ | - | - | - | - | १२ | २४% |
| ३ | पालघर | - | - | १ | - | - | - | - | - | - | - | - | १ | २% |
| एकूण | | १३ | ६ | - | ३ | ३ | ५ | २ | ४ | ३ | ४ | १ | ५१ | १००% |
| टक्केवारी | | २५ | १२ | १३ | ६ | ६ | १० | ४ | ८ | ६ | ८ | २ | १००% | |

सर्वेक्षण करण्यात आलेल्या ५१ कामगारांपैकी १३ (२६%) कामगारांची नोकरी, एक वर्षापेक्षा कमी झालेली आहेत म्हणजे ते नोकरीस नव्यानेच लागलेले आहेत. पाच वर्षापर्यंत नोकरी झालेले २४(४७%) कमगार आहेत तर पाच वर्षापेक्षा जास्त नोकरी झालेले १४(२७%) कामगार आहेत.

